संफौजदारी प्रकरण क्र. २५/२०१९
शासन वि. बाबु.
**नि.क्र. १५**

**अभियोग पक्षाचा सा.क्र. ०२ यांचा शपथेवर पुरावा**

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगते की,

माझे नांव – विष्णुदास नरसिंग श्रीमंगले

वय – ४६ वर्षे, धंदा - वाहक,

रा. क्षेत्रपाळ ता.उदगीर जि. लातूर.

**सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एस. भराडीया यांच्या तर्फे सरतपास शपथेवर सुरु.**

१. मी आरोपीला ओळखत नाही. मी आरोपीला पाहीलेले नाही. मी २० वर्षापासून राज्य परिवहन महामंडळात वाहक या पदावर आहे. घटना दि. ३०.१२.२०१८ रोजी दुपारी ०४.०० वा. चापोली शिवारात घडली आहे. माझे सोबत चालक शंकर कराड होते. आम्ही अहमदपूरवरुन लातूरला चाललो होतो. आमच्या बसचा क्र.एम.एच.१४-बी.टी.०१७२ असा होता. समोरुन भरधाव वेगाने एक ट्क आला होता व तो आमच्या बसला घासला होता. साधारण २५,०००/- रु.चे आमच्या गाडीचे नुकसान झाले होते. आमच्या गाडीचा पत्रा फाटला होता व काचा फुटल्या होत्या.

२. माझे गाडीच्या चालकाने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. ट्कचा क्र. एम.एच.२६-ए.डी.-९४८४ असा होता. माझा पोलीसांनी जबाब घेतला होता.

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी.व्ही. सोमवंशी यांच्या मार्फत.**

३. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनेच्या वेळी लातूर अहमदपूर रस्ता अरुंद होता. हे मला माहीत नाही की, त्यावेळी रस्ता नादुरुस्त होता व भरपूर खड्डे पडलेले होते. त्या दिवशी शिरुर ताजंबद या गावातून गाडीमध्ये प्रवासी बसले होते. हे म्हणणे खरे आहे की, तिकीट काढण्याकरीता मला प्रवाशांच्या बसण्याच्या

ठिकाणापर्यंत जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, मला तिकीट काढण्याकरीता मागे जावे लागते त्यामुळे चालकाला जे दिसते ते मला दिसू शकत नाही. गाडीतील प्रवाशाना कोणालाही कांहीही झाले नव्हते. गाडीमध्ये त्या दिवशी अंदाजे ४० ते ४२ प्रवाशी होते. आमच्या बसची ४४ प्रवाशी क्षमता असते.

प्रश्न- तुमच्या वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही जबाब दिला आहे.

उ.- हो, जशी घटना घडली तसा मी जबाब दिला आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, समोरुन एक भरधाव ट्क आला व आमच्या बसला घासला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत अपघात मी पाहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ट्कचा प्रत्यक्ष क्रमांक पाहीला नाही व तो मला ऐकीव माहीतवर समजला आहे. हे मला माहीत नाही की, त्या ट्कवरील चालक व वाहक मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.01.06 13:54:46 +0530

(व्ही.एस. वाघमोडे)

दि. ०६.०१.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.